# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.
## कोकण परिमंडळ कार्यालय
## ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी

---

ग्राहक तक्रार क्र. २२/२०१४ दि. १६.०९.२०१४

| | |
|---|---|
| श्री.तानाजी नारायण कांबळे<br>मु.पो. कोळंब, बौध्दवाडी,<br>ता.राजापूर, जिं.रत्नागिरी | तक्रारदार ग्राहक |

विरुध्द

| | |
|---|---|
| कार्यकारी अभियंता, महावितरण<br>विभागीय कार्यालय रत्नागिरी | विरुध्द पक्षकार |
| फोरम उपस्थिती | १) श्री. डी. एस्. जामखेडकर,<br>अध्यक्ष<br>२) श्री. व्ही. बी. जगताप,<br>सचिव तथा कार्यकारी अभियंता<br>३) श्री. ज. पु. बिवलकर<br>सदस्य |
| ग्राहकाच्या वतीने | १) सौ. विद्या विश्वास कांबळे (प्रतिनिधी ) |
| विरुध्द पक्षकाराच्या वतीने | १) श्री. अनिल वासूदेव महाजन<br>कार्यकारी अभियंता, रत्नागिरी |

**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग, ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल (ओम्बुडस्मन) विनियम २००६ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :**

श्री. तानाजी नारायण कांबळे, मु.पो. कोळंब,बौध्दवाडी, ता.राजापूर, जि. रत्नागिरी यानी त्यांचे रहाते घराचे वीज देयक अवास्तव रक्कमेचे आले असून सदर वीज देयक महावितरण कडून योग्य आकारणी करुन दुरुस्त करणेत येत नसल्याबाबतची तक्रार फॉर्म 'अ' मध्ये या मंचाकडे दि.१६.०९.२०१४ रोजी दाखल केली आहे. तक्रार प्राप्त होताच मंचाकडील पत्र क्रं. १३८ दि.१७.०९.२०१४ अन्वये कार्यकारी अभियंता विभागीय कार्यालय रत्नागिरी यांचेकडे स्पष्टीकरण मागविणेत आले. महावितरण कडून त्यांचे पत्र क्रं. ७१०५ दि.०१.१०.२०१४ अन्वये स्पष्टीकरण सादर करणेत आले त्यानंतर महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या अधिनियमामधील तरतुदीनुसार उभयपक्षाना नोटीस काढून दि.१४.१०.२०१४ रोजी सुनावणीची प्रक्रिया पुर्ण केली.

तक्रारदार ग्राहक श्री तानाजी नारायण कंाबळे यांच्या तक्रारीचे स्वरुप असे आहे की, त्यांचे वर नमुद केलेल्या पत्त्यावर रहाते घर आहे. सदर घरामध्ये ग्राहक क्रं.२१४९२०००२१५३ नुसार दि.२५.१०.२००६ पासून वीजेचे कनेक्शन आहे सदर कनेक्शनची येणारी वीज बीले ते नियमीत भरत आहेत. पण नोव्हेंबर २०१२ या महीन्याचे वीज बील अचानकपणे २९२९ युनिटचे रु. २३४१०/- इतक्या रक्कमेचे त्याना मिळाले. त्यांचा मासिक वीज वापर सरासरी ६० ते ८० युनिट इतकाच आहे पण रिडींग न घेता अंदाजे बीले दिलेली असल्यामुळेच इतके अवास्तव बील त्याना महावितरणकडून देणेत आलेले आहे. सदर बील प्राप्त होताच जुलै २०१३ मध्ये त्यानी सहाय्यक अभियंता राजापूर यांचेकडे लेखी अर्ज देऊन वीज देयक दुरुस्त करण्याबाबत कळविले त्यानंतर महावितरणकडून हे देयक कमी करुन रु. २४५०/- इतक्या रक्कमेचे सुधारित करण्यात आले. व हे बील भरलेनंतरच त्यांना वीजपुरवठा जोडणेत आला पण यानंतर येणाऱ्या बीलामध्ये पुन्हा रु. १४०००/- ते रु. १५०००/- इतकी थकबाकी दाखवून बीले देणेत आली आहेत. ही थकबाकी त्याना मान्य नसलेमुळे त्यानी वीज देयकाचा भरणा केला नाही, त्यामुळे महावितरण कडून त्यांचा वीज पुरवठा मार्च २०१४ मध्ये खंडीत करणेत येऊन ऑगस्ट २०१४ मध्ये हा मीटर काढून नेणेत आला आहे. त्यामुळे नोव्हेंबर २०१२ चे वीज देयक दुरुस्त करुन देणेत यावे व खंडीत केलेला वीज पुरवठा पुन्हा जोडून देणेत यावा अशी विनंती त्यानी आपल्या अर्जामध्ये केलेली आहे.

महावितरणकडून दाखल करणेत आलेल्या स्पष्टीकरणामध्ये त्यानी नमुद केले आहे की, महाराष्ट्र वीज नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच विद्युत लोकपाल) अधिनियम २००६ विनियम ६.२ नुसार तक्रारदाराने आपला अर्ज प्रथम अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाकडे दाखल करणे अपेक्षित असून त्यामुळे त्याच अधिनियमामधील विनिमय क्रं.६.७ नुसार मंचाने हा अर्ज फेटाळण्याबाबत विनंती केली आहे. तरीही महावितरणकडून या ग्राहकाचा वीजवापर सरासरी ६० युनिट असल्याचा निष्कर्ष काढणेत आला असून मे २०१२ ते नोव्हेंबर २०१२ या कालावधीचे वीज देयक दुरुस्त करण्यात आलेले असून या बीलामध्ये रु.२३५४१/- इतक्या रक्कमेची वजावट देणेत आलेली आहे. तसेच खंडीत केलेला वीज पुरवठा दि. ०१.१०.२०१४ रोजी पुन्हा जोडून देणेत आलेला आहे. या सुधारित वीज देयकाचा विचार कडून व महावितरणकडून करणेत आलेली कार्यवाही विचारात घेऊन योग्य तो निर्णय देणेत यावा अशी विनंती करणेत आली आहे.

सुनावणीसाठी ग्राहक प्रतिनिधी सौ. विद्या विश्वास कांबळे तसेच महावितरणकडून श्री महाजन कार्यकारी अभियंता उपस्थित होते पण सुनावणी सुरु होण्यापुर्वीच सौ. कांबळे यानी लेखी निवेदन सादर करुन महावितरणकडून वीज बीलामध्ये योग्य ती दुरुस्त करणेत आलेली असून पुढील येणारी बील देखील रिडींगनुसार देणेबाबत हमी मिळालेली असल्यामुळे मंचाकडे दाखल करणेत आलेली तक्रार तक्रार मागे घेत असल्याबाबत कळविले आहे. सदर लेखी निवेदनाचा विचार करता मंचाकडून देखील तक्रारदारानी दाखल केलेली तक्रार निकालात काढणेत आली आहे.

## आदेश

**१) ग्राहकाची तक्रार निकाली काढणेत येत आहे .**

**२) या आदेशाविरुध्द अर्जदारास अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात अपील दाखल करता येईल.**

**पत्ता :- सचिव,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग,**
**६०६/६०८, केशवा,**
**बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुबंई ४०००५१.**
**फोन नं. ०२२- २६५९२९६५**

| | | |
|---|---|---|
| **श्री. डी. एस्. जामखेडकर** | **श्री. व्हि.बी.जगताप** | **श्री.ज.पु.बिवलकर** |
| **अध्यक्ष** | **सचिव / कार्यकारी अभियंता** | **सदस्य** |
| **ग्रातनिमं, कोकण परिमंडल** | **ग्रातनिमं, कोकण परिमंडल** | **ग्रातनिमं, कोकण परिमंडल** |

**दिनांक :- १७.१०.२०१४**
**ठिकाण :- रत्नागिरी.**